N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** शाहुपूरी **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0657 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/10/2020 05:29 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 01/10/2020
**Date To ( दिनांक पर्यंत):** 08/10/2020
**Time From (वेळेपासून):** 11:49 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:53 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 09/10/2020 **Time (वेळ):** 04:54 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 005 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/10/2020 04:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 4 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सहा आयुक्त,मत्स्य व्यवसाय विभ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजेश शामराव मोरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1975 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | बी बिल्डींग,सर्वसाक्षी गणेश मंदीरजवळ,महावीर कॉलेजजवळ, कोल्हापूर,शाहुपूरी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | बी बिल्डींग,सर्वसाक्षी गणेश मंदीरजवळ,महावीर कॉलेजजवळ, कोल्हापूर,शाहुपूरी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रदिप केशव सुर्वे | | | 1. दुसरा मजला, फ्लट नं 203,,ब्ल्यू वेल सोसायटी,, कारंडे मळा, कोल्हापूर, शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादि दिनांक -09/10/2020मी श्री. राजेश शामराव मोरे, वय वर्षे 45, व्यवसाय - मत्सशेती (चेअरमन-श्री. गजानन महाराज मत्स व्यवसाय सहकारी संस्था मर्या.) रा. 466-ब, शाहु रोड, व्हिनस कॉर्नर, कोल्हापूर. मोबाईल नं-9225301010, 9860901010 समक्ष पोलीस ठाणेमध्ये हजर राहुन फिर्यादि देतो की, मी वरील पत्यावर कुटूंबियांसह राहाणेस असुन श्री. गजानन महाराज मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था मर्या. तुडये, ता. चंदगड या संस्थेचा चेअरमन आहे. आमचे संस्थेचे मुख्य कार्यालय 466-ब, शाहु रोड, व्हिनस कार्नर, कोल्हापूर येथे असुन आमचे संस्थेकडे तिलारी जलाशय व पालेश्वर तलाव हे मत्स्य उत्पादनासाठी ठेका तत्वावर आहेत. आमचे संस्थेमध्ये साधारण 600 सभासद असुन सन 2019 मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे आमचे संस्थेचे वरील जलाशयातील मासे व मासे◌ उत्पादनासाठी लावलेल्या जाळया वाहुन गेल्या होत्या. त्यामुळे आमचे संस्थेच्या सभासदाचे खुप आर्थिक नुकसान झाले होते. त्याबाबत महाराष्ट्र शासनाने पुरग्रस्तासाठी नुकसान भरपाई जाहीर केली होती. आमचे संस्थेच्या जलाशयांचे महसुल विभागामार्फत रितसर पंचनामे करण्यात आले होते. अतिवृष्टीमुळे झालेली नुकसान भरपाई मिळणेसाठी सहा.आयुक्त, मत्स्य व्यवसाय कार्यालय, जि. कोल्हापूर यांचे कार्यालयाकडुन शासनाकडे प्रस्ताव पाठविणेत आला होता. सदर प्रस्तावानुसार महाराष्ट्र शासनाकडुन आमचे संस्थेस माशांची नुकसान भरपाई म्हणुन रू. 26 लाख रक्कम आमचे संस्थेच्या बंक खात्यावर सहा. आयुक्त, मत्स्य व्यवसाय कार्यालयामार्फत दि. 14/09/2020 रोजी जमा झाली आहे. परंतु मत्स्य जाळयांची नुकसान भरपाई अद्यापी आमचे संस्थेस मिळालेली नाही.त्यानंतर आठवड्याभरापुर्वी माझी व प्रभारी सहा. आयुक्त श्री. सुर्वे यांचेशी भेट झाली. तेव्हा त्यांनी आम्चे संस्थेला त्यांचे कार्यालयामार्फत पाठविलेल्या प्रस्तावामुळेच 26 लाख रूपये नुकसान भरपाई मिळाली आहे, असे म्हणुन नुकसान भरपाई रक्कमेच्या 40 टक्के रक्कम म्हणजेच साधारण 10 लाख रूपये माझेकडे मागितले, नाहीतर उर्वरित नुकसान भरपाईची रक्कम संस्थेला मिळणार नाही, असे त्यांनी सांगितले. तेव्हा मी साहेब संस्थेचे खुप नुकसान झाले आहे, आणि ही रक्कम नुकसान भरपाई म्हणुन मिळाली आहे, 10 लाख रूपये खुप होतात असे म्हणुन विनवनी केली. परंतु त्यांनी माझे काही न ऐकता पैसे दिले तरच पुढील नुकसान भरपाई मिळेल नाहीतर मिळणार नाहीत असे ते म्हणाले. त्यावर मी ठिक आहे मी माझे सहका-यांशी बोलुन सांगतो असे म्हणुन तेथुन निघुन आलो होतो. त्यानंतर रविवार दि. 27/09/2020 रोजी सुर्वे हे मला माझे अर्पाटमेंट खाली येवुन भेटले, तेव्हा त्यांनी परत नुकसान भरपाई मिळवुन दिलेबाबत पैशाची मागणी करून शेवटी 7,00,000/- रुपये तरी कमीत कमी द्यावे लागतील असे सांगितले. तेव्हा त्यांना मी 2-3 दिवसात भेटुन चर्चा करू असे सांगितले होते. मी उद्या दि. 30/09/2020 रोजी प्रभारी सहा.आयुक्त सुर्वे यांना भेटणेस जाणार आहे, तेव्हा ते माझेकडे परत पैशाची मागणी करतील. त्यांना लाच देणेची माझी ईच्छा नसल्याने मी दि.29/09/2020 रोजी त्यांचेविरुध्द अन्टी करप्षन ब्युरो, कोल्हापूर येथे समक्ष हजर राहुन डीवायएसपी बुधवंत साहेबांच्याकडे लेखी तक्रारी अर्ज दिला.त्यावेळी दिनांक 30/09/2020 रोजी सहा. आयुक्त सुर्वे यांच्या लाचेच्या

मागणीची पडताळणी करण्याचे ठरविले होते. परंतू दिनांक 30/09/2020 रोजी सुर्वे हे सातारा येथे गेलेने पडताळणी करता आली नाही. दिनांक 01/10/20202 रोजी मी अन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात आलेवर त्या दिवशी सहा. आयुक्त सुर्वे यांच्या लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. त्याकरिता डिवायएसपी बुधवंत साहेबांनी बोलावून घेतलेले पंच नरवाडे व श्रीमती काळे मडम यांचेशी तसेच त्यांचे कार्यालयातील कर्मचारी पोहेका अजय चव्हाण, पोहेका शरद पोरे, पोका मयुर देसाई, रूपेष माने यांचेशी माझी ओळख करुन दिली. मी माझी तक्रार पंचांना थोडक्यात सांगितली. श्री. बुधवंत साहेबांनी माझा तक्रारी अर्ज पंचांना वाचणेस दिला. मी सांगितलेली तोंडी तक्रार व लेखी दिलेला अर्ज यातील मजकूर एकच असल्याची खात्री झाालेने पंचांनी व श्री. बुधवंत साहेबांनी माझे अर्जावर सह्या केल्या. त्यानंतर प्रथम सहा. आयुक्त सुर्वे यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी करावयाचे ठरविणेत येवुन त्या कारवाई करीता पंच नं.1 म्हणुन श्री. नरवाडे व पंच नं. 2 म्हणुन श्रीमती काळे मडम यांची निवड करणेत आली. तेव्हा श्री.बुधवंत साहेब यांनी मला प्रभारी सहा.आयुक्त श्री.सुर्वे कोठे भेटणार आहेत? असे विचारले, त्यावर मी त्यांना आपण प्रथम त्यांचे कार्यालयात जाउन ते कोठे बोलवतील तेथे मला भेट घेण्यासाठी पाठविण्याचे ठरवुन त्यांनी त्यांचे कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड घालुन त्यामध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याची माझी व पंचांची खात्री करून दिली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंघाने श्री.बुधवंत साहेबांनी मला व पंचांना योग्य त्या सुचना देवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर माझे गळ्यामध्ये अडकवुन चालु करून मला आणि पंच नं.1 नरवाडे यांना प्रभारी सहा.आयुक्त सुर्वे यांची भेट घेणेसाठी माझेकडील कारने सुर्वे यांचे कार्यालयात पाठविले. त्या पडताळणी कारवाईमध्ये माझी सुर्वे यांचेशी त्यांचे कार्यालयात भेट झाली.त्या भेटीमध्ये सुर्वे यांनी प्रथम 7,00,000 /-रु. असे म्हणत 5,00,000/-रु. रक्कम लाचेची मागणी करुन त्यापैकी 2,00,000/- रुपये लाच रक्कम स्वीकारणेचे मान्य करुन नंतर फोन करतो असे सांगितले.सहा. आयुक्त सुर्वे यांना लाच रक्कम देणेसाठी लागणारी रक्कम मी माझे कार्यालयात जावून रक्कम घेवून अन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात परत आलो थोड्यावेळाने मी सुर्वे यांना फोन केला असता त्यांनी मला कोल्हापूरात थांबणेस सांगून नंतर फोन करतो असे सांगितले. त्यामुळे श्री. बुधवंत साहेबांनी लागलीच सापळा कारवाई आयोजित केली. त्यांचे सुचनेवरुन लाच रक्कम त्यांचेकडे दिली. श्री. बुधवंत साहेबांनी त्यांचे कार्यालयात मला व पंचाना सापळापुर्व पंचनाम्याचे महत्व सांगून अल्ट्राव्हायोलेट बटरी व अंथ्ाराासिन पावडरचे महत्व समजावून सांगितले. मी दिलेल्या लाच रक्कमेच्या नोटांना पोका देसाई यांनी अन्थ्रासिन पावडर लावून त्या नोटांचे चार बंडल तयार केली. त्याचबरोबर मी सोबत आणलेल्या कापडी करीबगला अन्थ्रासिन पावडर लावणेत आली. व सापळा कारवाईच्या अनुषंगाने मला व पंचांना तसेच सापळा पथकातील कर्मचा-यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही सुर्वे यांचे फोनची वाट पाहत थांबुन राहिलो, परंतू त्यांनी मला फोन केला नाही. म्हणून मी त्यांचे मोबाईलवर फोन केले. परंतू त्यांचा फोन बंद असल्याने त्यांचेशी संपर्क होवू शकला नाही. त्यामुळे त्या दिवशी सापळा कारवाई बंद करुन ज्या वेळी सुर्वे मला फोन करुन बोलवतील त्यावेळी त्या ठिकाणी सापळा कारवाई करण्याचे ठरविले. दिनांक 07/10/2020 रोजी आम्ही सर्वानुमते सहा. आयुक्त सुर्वे यांचे विरुध्द थेट सापळा कारवाई करण्याचे आयोजन केले. डिवायएसपी श्री. बुधवंत साहेबांच्या सुचनेप्रमाणे मी सुर्वे यांना फोन केला तेव्हा त्यांनी 4 ते 4.30 वा. फोन करतो असे सांगून फोन बंद केला. त्यामुळे आम्ही त्यांचे फोनची वाट पाहत थांबून राहिलो. त्यांचा फोन न आलेने त्यांना फोन केला,परंतू त्यांचा फोन बंद लागलेने कारवाई करता आली नाही. त्यामुळे दुसरे दिवशी माझे कार्यालयातून सापळा कारवाई आयोजित करण्याचे आम्ही ठरविले. दि. 08/10/2020 रोजी सकाळी डिवायएसपी श्री. बुधवंत साहेब हे सापळा पथकासह माझे आफिसमध्ये आले. आम्हां सर्वांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने सुचना दिल्या. त्यावेळी त्यांचेकडील लाच रक्कम 2,00,000/-रु असलेली कापडी करीबंग माझेकडे दिली. तसेच माझे गळ्यात डिजीटल व्हाइस रेकार्डर अडकविले व मला आणि पंच नरवाडे असेंना माझी कार नंबर डभ्.09. ळ.1400 मधून सहा. आयुक्त मस्त्य व्यवसाय विभाग,कोल्हापूर कार्यालयात पाठविले. त्यावेळी सुर्वे यांना भेटून त्यांचेशी चर्चा केली. तेव्हा त्यांनी दुपारी 3.30 ते 4.00 वा.चे दरम्यान आपण कलेक्टर आफिस समोरील इराणी कफेमध्ये काफी घेउ असे सांगितलेने मी व पंच नरवाडे असे माझे आफिसमध्ये परत आलो. त्यानंतर मी सुर्वे यांना दुपारी 04.00 वा.फोन करुन काफी घेण्यास जायचे काय ? असे विचारले असता आता मी आनलाईन मिटींगमध्ये आहे.नंतर फोन करतो असे सांगून फोन बंद केला. त्यानंतर पुन्हा सायंकाळी मी सुर्वे यांना फोन करुन काफी घेण्याबद्दल विचारले असता त्यांनी 10 ते 15 मिनिटात मी तुमच्या व्हीनस कार्नर येथील आफिस मध्ये येतो तेथूनच काफी घेण्यासाठी जावू असे सांगितलेने त्या ठिकाणीच सापळा कारवाई करण्याचे आयोजित करण्याचे ठरविले. डिवायएसपी श्री. बुधवंत साहेबांनी लाच रक्कमेची बग माझेकडे दिली. ती बग मी माझ्याकडील आफिसबंगमध्ये ठेवली. त्याचबरोबर माझ्या गळ्यात डिजिटल व्हाईस रेकार्डर चालू करुन अडकवला. पंच नं. 1 नरवाडे यांना आफिसच्या बाहेर दरवाजाजवळ थांबविले.डिवायएसपी श्री. बुधवंत साहेब व त्यांचे सापळा पथकाने माझ्या आफिसच्या बाहेर सापळा लावला. थोड्याच वेळात सुर्वे हे त्यांचे शासकीय सुमो गाडीतून माझ्या आफिस मध्ये आले. त्यावेळी आमचेत थोडी चर्चा झालेवर सहा. आयुक्त सुर्वे यांनी माझेकडून 2,00,000/-रु. ची रक्कम असलेली करी बंग स्वीकारली त्यावेळी आम्ही बोलत बोलत माझ्या आफिसच्या बाहेर आलो. सुर्वे यांनी माझ्याकडून लाच रक्कम स्विकारली असल्याने मी त्याबाबत सापळा पथकास पुर्व नियोजित इशारा केला. तेथेच असलेले डिवायएसपी श्री. बुधवंत साहेब व सापळा पथकातील कर्मचारी यांनी सुर्वे यांना लाच रक्कम असलेली करीबंगसह त्यांना ताब्यात घेतले.त्यावेळी सहा. आयुक्त सुर्वे यांचे नांव प्रदिप केशव सुर्वे, वय 52, प्रभारी सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय विभाग,कोल्हापूर रा.ब्ल्यू वेल सोसायटी, दुसरा मजला, फ्लट नं. 203, कारंडे मळा, कोल्हापूर असे असल्याचे समजले. त्यानंतर आम्ही सर्वजण अन्टी करप्शन कार्यालयात परत आलो. त्या ठिकाणी श्री. बुधवंत साहेब व त्यांचे पथकातील कर्मचारी यांनी पंचनाम्याची कारवाई पुर्ण करून त्यामध्ये कारवाई करिता वापरलेले मेमरी कार्ड, लाच रक्कम 2,00,000/- रू. व कापडी करीबंग जप्त केली आहे. तरी प्रदिप केशव सुर्वे, वय 52, प्रभारी सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय विभाग, कोल्हापूर रा.ब्ल्यू वेल सोसायटी, दुसरा मजला, फ्लट नं. 203, कारंडे मळा, कोल्हापूर यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या माशांचे नुकसान भरपाई मिळवून दिलेबाबत बक्षीस म्हणून आणि मत्स्य उत्पादनाच्या जाळ्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई मिळवून देण्यासाठी म्हणून प्रथम 10,00,000/-रुपये लाचेची मागणी केलेचे मान्य करुन 7,00,000/-रुपये लाचेची मागणी केली व नंतर तडजोडीअंती 5,00,000/-रू. लाचेची मागणी करुन त्यापैकी 2,00,000/-रु.लाचेची रक्कम स्वीकारल्याने माझी त्यांचेविरुध्द माझी फिर्याद आहे.समक्ष

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): raviraj anil phadnis
**Rank** (पद): SI (Sub-Inspector)
**No.**(क्र.): 15101000402rap **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Rajesh

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो. ठाणे अंमलदार
शाहूपुरी पोलिस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): shrikrishna laxmanrao
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pbmh79953

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेहरा के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्य सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त खालील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)